# *मेळा मराठीचा जमला खासा!*

- ***मंजिरी जोशी*** (संपर्क समिती, बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, २०१९)

उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचं १९वं अधिवेशन ११ ते १४ जुलै या काळात डॅलसमध्ये थाटात पार पडलं. आम्हा डॅलसवासियांना गेली अनेक वर्षं याचे वेध लागले होते. अखेर अधिवेशनाचं यजमानपद आम्हाला प्रथमच लाभलं आणि ते टेक्सन स्टाईलमध्ये भव्य स्वरूपात सादर करायला आम्ही सज्ज झालो. गेली दोन वर्षं संयोजक दिलीप राणे आणि सहसंयोजक हर्षद खाडिलकर यांच्या नेतृत्वाखाली सुमारे तीनशे कार्यकर्ते झटत होते. बीएमेम अधिवेशन म्हणजे जगन्नाथाचा रथ! त्याला शेकडो लोकांचा हातभार लागला तेव्हा तो मार्गी लागला. आमच्या कष्टांना फळ मिळालं आणि कार्यक्रम यशस्वी झाला याचं मोठं समाधान सर्वांना मिळालं.

परक्या भूमीवर माय मराठीचा झेंडा रोवायचा म्हणजे त्याचे किती विविध पैलू असतात! भाषा, संस्कृती, आहार, पेहराव, करमणूक आणि त्याबरोबरच सामाजिक बांधिलकी....या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही कार्यक्रमांचं आयोजन केलं. ‘सूर गुंजती अभिनवतेचे, फुलवित नाते परंपरेचे’ या आमच्या घोषवाक्याला अनुसरून आपला परंपरेचा अमोल ठेवा तंत्रज्ञानाच्या कोंदणात बसवण्याचा आम्ही प्रयत्न केला. सर्व कार्यक्रमांचं स्थळ, वेळ निश्चित झाल्यावर आमच्या तंत्रज्ञान समितीने अधिवेशनाचं ॲप बनवलं, त्यामुळे पाहुण्यांना कोणतीही माहिती सेलफोनवर सहज मिळू लागली. तसंच, अधिवेशनाची स्मरणिका छापील स्वरुपाबरोबरच फ्लिप-बुक स्वरूपात उपलब्ध केली. आता ती तुम्हालासुध्दा सेलफोनवर वाचता किंवा ऐकता येईल.

अधिवेशनाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. अरुणा ढेरे म्हणजे मराठी साहित्यातील मानाचं पान! त्यांच्या कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिलीच, पण त्यांचं अध्यक्षीय भाषण तर एवढं विचार करायला लावणारं होतं, की ते प्रत्यक्षच ऐकायला हवं! सौम्य सात्विक भाषेत त्यांनी परंपरेचं आधुनिक रूप आणि समाज जोडण्यातला सहभाग स्पष्ट केला. परंपरेची गतिमानता त्यांनी कट्यारीच्या गोष्टीतून किती छान मांडली!

‘शब्दांच्या गावा जावे’ या कार्यक्रमात मराठी भाषेच्या गमती सांगणाऱ्या दीपाली केळकर म्हणाल्या की, “माझ्या कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद अनपेक्षित होता, पण ऊर्जा देणारा होता.” कोणाला कल्पनाही नसेल की उभी हयात अमेरिकेत घालवलेल्या वृध्दांसकट सुमारे चार हजार लोक अधिवेशनात लगबग करतांना छान मराठीत गप्पा मारत होते. त्यांचं ऐकून सिक्युरिटीचे स्थानिक गार्डही दोन दिवसांत ‘चला, लवकर चला’ असं म्हणायला शिकले होते. (आजकाल पुण्या-मुंबईलासुध्दा इतकं मराठी ऐकायला मिळत नाही.)

आपल्या संस्कृतीचं दर्शन तर क्षणोक्षणी घडत होतं. अधिवेशनाची सुरुवातच आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर झाली. तेव्हा एका दालनात खास उभारलेल्या विठ्ठलमंदिरासमोर दणक्यात आरती झाली. ‘वारी पंढरीची’ या कार्यक्रमात ‘विठूचा गजर’ दुमदुमला. दुसऱ्या दिवशी सकाळी डॅलस शहराच्या रस्त्यावरून आमची गौरवयात्रा वाजतगाजत फेरफटका मारून आली तेव्हा स्थानिक लोक कुतुहलाने पहात होते.....शिवाजी महाराज, संत परंपरा आणि मराठी साहित्यातील दिग्गज यांच्या दिंडी! लेझीम पथक आणि ढोलताशांचा कडकडाट! फेटे, नऊवारी आणि नथी असे मराठमोळे पेहराव!

ज्ञानेश्वरी म्हणजे आपली मराठी मातीतली भगवद्गीता! ज्ञानेश्वरीचे अभ्यासक, सुप्रसिध्द प्लास्टिक सर्जन डॉ. रविन थत्ते हे आमचे प्रमुख वक्ते होते. आमच्या घोषवाक्यातील अभिनवता आणि परंपरा यांचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. थत्ते! त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणातून ज्ञानोबा माऊलींचं एक वेगळे रूप दिसलं आणि मन तृप्त झालं. तीच गोष्ट मकरंदबुवा रामदासी यांची! मेकॅनिकल इंजिनिअर असलेले मकरंदबुवा समर्थभक्त आहेत. आपल्या कीर्तनातून अगदी सोप्या भाषेत ते भक्ती-ज्ञान-वैराग्य या त्रिसूत्रीची ओळख करून देतात. रोजच्या जीवनात अध्यात्माचा सहज समावेश कसा करावा हे त्यांच्याकडून अगदी तरुणांनीही शिकणं आजच्या अस्थिर वातावरणात फार आवश्यक आहे.

महाराष्ट्राचा आणखी एक पैलू म्हणजे आपली खाद्यसंस्कृती! मालवणी, खानदेशी, कोल्हापुरी, पेशवाई अशा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या पदार्थांनी अधिवेशनातील भोजनात हजेरी लावली. आपल्या पाहुण्या कलाकारांपैकी काहींनी दिलखुलासपणे कबुली दिली की, “महाराष्ट्रात राहूनही इतके मराठी पदार्थ आम्हाला ठाऊक नव्हते!” पण असे पदार्थ एवढ्या मोठ्या प्रमाणावर बनवणे सोपे नव्हते, महाराजा! परदेशात भारतीय खाद्यपदार्थ म्हणजे पंजाबी, गुजराथी किंवा दाक्षिणात्य पदार्थ असतात. मराठी माणसं व्यवसायात जरा मागेच, त्यामुळे मराठी खाद्यपदार्थ परदेशांत पोचू शकले नाहीत अजून! मग आमच्या भोजन समितीने अक्षरशः कंबर कसली, मराठी पदार्थांच्या पाककृती केटररला शिकवल्या आणि भोजनाचे जंगी बेत वास्तवात आणले. हृदयाचा मार्ग पोटातून जात असेल तर आम्ही सर्व पाहुण्यांची हृदयं नक्कीच जिंकली!

मराठी वातावरण तर साऱ्या अधिवेशनात भरुन राहिलं होतं. भारतीयच नव्हे तर मराठमोळ्या पेहरावात सर्वांची वर्दळ सुरू होती. “जेवण झाल्यावर शिवाजी पुतळ्याजवळ भेट” किंवा “विठ्ठल- मंदिराशेजारी मस्त कुर्ते मिळताहेत” अशी वाक्यं कानावर पडत होती आणि मन एकदम मराठी भूमीवर पोचत होतं. संध्याकाळी सुबोध भावेंशी ‘रुबरू’ करायला किंवा संगीतकार अशोक पत्कींचे ‘सप्तसूर’ ऐकायला नटूनथटून जाताना पेढे, अत्तर, मोगऱ्याचे गजरे यांनी स्वागत होत होतं. आमच्या सजावट समितीचे आणि स्वागत समितीचे कष्ट फलद्रूप होत होते. या वातावरणात आम्ही टेक्ससची माती कशी विसरणार? ती तर आमची कर्मभूमी! भव्य टेक्सन स्टाईलच्या संयोजनाचाच एक भाग म्हणून टेक्स-मेक्स पदार्थांचा आस्वाद घेताना अचानक ‘मारिआची’ बँड टेबलाजवळ वाजत होता तर शेवटच्या दिवशी आमचे स्वयंसेवक ‘काउबॉईज’ बनून हसत नाचत निरोप घेत होते.

तृप्त करणाऱ्या भोजनासारखाच महत्वाचा पैलू म्हणजे करमणुकीचे कार्यक्रम! भारतातील अनेक नामवंत कलाकारांनी त्यांचे कार्यक्रम सादर केले आणि उत्तर अमेरिकेतील अनेक कार्यक्रमांनी ‘हम भी कुछ कम नही’ हे दाखवून दिले. समारोपाचा कार्यक्रम म्हणजे हृषिकेश जोशी यांनी खास लिहिलेली अफलातून कॉमेडी होती आणि त्यात मकरंद अनासपुरे, विशाखा सुभेदार, संकर्षण कऱ्हाडे, स्पृहा जोशी, हेमांगी कवी अशा कलाकारांनी धमाल आणली. पण उद्घाटनाचा आमच्या स्थानिक कलाकारांचा कार्यक्रमही सर्वच बाबतीत अगदी तोडीस तोड होता. आपल्याला सांस्कृतिक आठवणींत रमायला नेहमीच आवडतं, पण त्या संस्कृतीचा वारसा पुढच्या पिढीला सुधारित रूपात दिला की नवी पिढी आपल्या अधिक जवळ येते आणि म्हणते, ‘आम्ही बीएमेमला आठवणी बनवायला येतो, जागवायला नाही!’ ही कल्पना चुरचुरीत संवादातून मांडली गेली आणि सोबत होता सुमारे दोनशे कलाकारांचा ताफा! पंडित विजय कोपरकर आणि देवकी पंडित यांनी ‘स्वरनक्षत्र’ ही मैफल रंगवली तर अश्विनी गोरे-देशपांडे यांनी ‘नाट्यस्वरांचा’ प्रवास घडवला. याशिवाय ‘डिअर आजो’ हे मयुरी देशमुख लिखित नाटक भारतातून खास आलं होतं. अमेरिकन नातीशी ‘नातं’ जुळवणारा आजोबा संजय मोने यांनी छान रंगवला. इथल्या ‘थिएट्रिक्स’ने पुलंच्या ‘बटाट्याच्या चाळीची’ सफर घडवली तर ‘बिग बँग’ने ‘प्रेमाच्या गावा जावे’ असं सांगितलं.

नाटकं आणि संगीत याशिवाय विषयांची एवढी विविधता होती! चारुहास पंडित यांचा ‘चिंटू’, डॉ. जगन्नाथ दिक्षित यांचा पंचावन्न मिनिटांचा डाएट प्लॅन, डॉ. संजय उपाध्ये यांचे ‘मन प्रसन्न करणारे’ प्रवचन, धनश्री लेले यांचा ‘मेघदूताचा’ रसास्वाद ही श्रोत्यांसाठी खास आकर्षणं होती, पण अमेरिकेच्या विविध प्रांतांतून जे कलागुणांचं दर्शन घडलं ते अभिमानास्पद होतं, वेगवेगळे विषय हाताळणारं होतं.... पौराणिक नायिका ते सप्तचक्र, सावरकर ते गदिमा, नृत्य-प्रकार ते वाद्यसंगीत! हृषिकेश जोशींच्या ‘जस्ट असंच’ गप्पा भन्नाट होत्याच पण इथल्या कलाकारांचे ‘उभ्या उभ्या विनोद’ही सात मजली हास्य निर्माण करत होते.

मेडिकल कॉन्फरन्स, बिझनेस कॉन्फरन्स आणि उत्तररंग यांनी सुरू झालेलं हे अधिवेशन उत्तरोत्तर रंगतच गेलं. आर्या आंबेकर आणि हृषिकेश रानडे यांच्या स्वरांनी ‘टिपूर टिपूर चांदणं’ पसरवलं आणि आमच्या ‘सारेगम’, ‘वाह उस्ताद’च्या स्पर्धकांनी आपण परदेशातही भारतीय संगीताचं रोपटं किती छान रुजवलंय हे आपल्या गायनाने सिध्द केलं. चित्रकला, फोटोग्राफी, ढोलताशा अशा अनेक कलांना वाव देणाऱ्या स्पर्धा घेण्यात आल्या. अमेरिकेत जन्मलेल्या

आपल्या भावी पिढीला या अधिवेशनात सहभागी करून घेण्यासाठी खास कार्यक्रम ठेवले होते. त्यांना आपल्या मराठी संस्कृतीची ओळख करून देण्याचा हा एक सोपा मार्ग होता.

ही सांस्कृतिक मौजमस्ती सुरू असतांना आपली सामाजिक बांधिलकी विसरून कसं चालेल? यंदा प्रथमच आम्ही ‘एनजीओ समिट’ आयोजित केली होती. महाराष्ट्र फौंडेशन, पाणी फौंडेशन, हेलो मेडिकल फौंडेशन, मराठी विज्ञान परिषद अशा विविध संस्थांचा यात सहभाग होता. या संस्थांचे भारतातील सामाजिक कार्य आणि त्यात अमेरिकेतील मराठी बांधव कशाप्रकारे हातभार लावू शकतील यावर पद्मभूषण प्रा. ज्येष्ठराज जोशी या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत उद्बोधक चर्चा झाली.

सुमारे साडेतीन दिवस चाललेल्या ह्या सोहळ्यात सर्वांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला, मराठी संस्कृतीशी असलेली नाळ दृढ केली, तिच्या प्रसाराला नवी दिशा दिली आणि दोन वर्षांनंतरच्या अधिवेशनाला जायचे बेत आखत तृप्त मनाने घराची वाट धरली.

***